MHTH120036632022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | १४ | ०६ | २०२२ |
| नोंदणी तारीख | : | १४ | ०६ | २०२२ |
| निकाल तारीख | : | ०२ | ०५ | २०२५ |
| **कालावधी** | **:** | **०२ व.** | **१० म.** | **१८ दि.** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र. ४) बेलापुर यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्रीमती ए.टी.बनसोड यांचे समक्ष)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ७८३/२०२२** **निशाणी क्र. (२०)**

| | |
|---|---|
| | गुन्हा क्र : I १२१/२०२२<br>पोलिस स्टेशन : नेरूळ |
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलिस स्टेशन, नेरूळ पोलीस ठाणे |
| अधिवक्ता | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. गायकवाड. |
| आरोपी | **१. मनसुर जबार अली.**<br>वय-३० वर्षे, व्यवसाय- नोकरी<br>**२. जबार बाबाकनू अली.**<br>वय- ५६ वर्षे, व्यवसाय- मजूरी,<br>दोघे रा. स्पर्श बिल्डींग, रूम नं.५०१,<br>प्लॉट क्र.१३, सेक्टर-३, उलवे, नवी मुंबई. |
| अधिवक्ता | आरोपींतर्फे वकील श्री. रामकर |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | दि.२६/०७/२०२० ते दि.२८/१२/२०२१ पर्यत |
| प्रथम खबरी तारीख | २९/१०/२०२१ |
| आरोपपत्राची दाखल तारीख | ०३/०६/२०२२ |
| आरोपपत्र निश्चित केल्याची तारीख | १८/०३/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | १८/०३/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | निरंक |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०५/२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर | निरंक |

| क्र | आरोपीचे नाव | अटकेची | जामीनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेले गुन्हे | निर्दोष किंव्हा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्र.सं च्या उद्देशाने खटलेच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मनसुर जबार अली** | ४१(१)(अ) | ----- | कलम ४९८अ, ३२३ ५०४, ५०६, ३४ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | **जबार बाबाकनू अली.** | ४१(१)(अ) | ----- | कलम ४९८अ, ३२३ ५०४, ५०६, ३४ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |

**<u>न्या य नि र्ण य</u>**
**( घोषणा दिनांक ०२ मे, २०२५)**

आरोपींत हे भारतीय दंड संहितेचे कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये निश्चित केलेल्या दोषारोपाच्या संपरिक्षेसाठी प्रस्तुत खटल्यात सामोरे गेले आहेत.

**<u>अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.</u>**

**०२.** दिनांक २६/०७/२०२० रोजी फिर्यादीचे लग्न आरोपी क्र. १ सोबत रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झाल्यानंतर ती तिच्या सासरी नांदायला गेली असता आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादी यांना लग्नात आमचा मानपान केला नाही तु लग्नात कोणत्याही वस्तू व पैसे आणले नाहीत असे बोलून तिचा अपमान करून घरातील किरकोळ कारणावरून आरोपी क्र.१ याने फिर्यादीला हाताबुक्कयांनी मारहाण करून, शिवीगाळ करून मानसीक व शारीरीक छळ केला. म्हणून फिर्यादीने आरोपींविरूध्द तक्रार दाखल केली.

**०३.** सदरच्या फिर्यादवरुन आरोपींविरूध्द गुन्हा क्रमांक-I १२१/२०२२ भारतीय दंड संहितेचे कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो.उप.निरीक्षक श्री.निवास मा. शिंदे यांच्याकडे देण्यात आला. तपासा दरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवून आरोपींविरुध्द सदर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपी विरूध्द नि.क्र.११ अन्वये दोषारोपपत्र नोंदवले. आरोपींना त्यातील मजकूर वाचून व समजावून दाखविण्यात आल्याचे समजते. त्यांनी नि.क्र. १२ ते १३ अन्वये दोषारोप अमान्य करुन खटला चालविण्याची मागणी केली. आरोपी विरूध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये बयान नि.क्र. १८ व १९ अन्वये नोंदविण्यात आले.

**०५.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २६/०७/२०२० रोजी उलवे, सेक्टर-१८, नवी मुंबई येथे आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादी यांना लग्नात आमचा मानपान केला नाही तु लग्नात कोणत्याही वस्तू व पैसे आणले नाहीत असे बोलून तिचा अपमान करून असे म्हणून तिस वाईट वागणुक देवून तिचा मानसिक व शारिरीक छळ | ....नकारार्थी |

केला ?

२. अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करून पैशाच्या कारणावरुन फिर्यादीस दमदाटी, शिवीगाळ व मारहाण करून इच्छापूर्वक किरकोळ दखापती केल्या ? ....नकारार्थी

३. अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादीचा अपमान करून त्यांना प्रक्षोभित केले ? ....नकारार्थी

४. अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादीस धमकी देवुन फिर्यादीच्या अंगावर धावुन येउन हाताबुक्क्यांनी मारहाण करून फौजदारीपात्र धाकदपटशा केली ? ....नकारार्थी

५. आदेश काय ? ....अंतिम आदेशानुसार

## : : कारण मिमांसा : :

## फिर्यादी/आरोपी/ न्यायालयाती साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष :-**

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| १. | नाझिया बेगम शेख | १५ | फिर्यादी |

**फिर्यादीपक्ष/आरोपी पक्ष/ न्यायालयातील निशाणी क्रमांकांची यादी**

**अ. फिर्यादीपक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | १६ आणि १७ | तक्रार आणि प्रथम माहीती अहवाल |

**<u>मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ करिता</u>:-**

**०६.** वरील सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे ते विचांरासाठी एकत्रित घेण्यात येत आहेत. साक्षीदार क्र.१ नाझिया बेगम शेख यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे सांगितले आहे की, आरोपी क्र.१ तिचे पती असून आरोपी क्र.२ सासरे आहेत. त्यांचे लग्न दि. २६/०७/२०२० रोजी रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झाले होते. लग्नानंतर फिर्यादी नांदण्याकरीता पतीच्या घरी गेली. फिर्यादीने पुढे कथन केले की, घटनेबाबत त्यांना काहीही आठवत नाही. दि.०३/०४/२०२२ रोजी फिर्यादीने पोलिस स्टेशन येथे तक्रार नि.क्र. १६ व प्रथम माहिती अहवाल नि.क्र. १७ अन्वये नोदविला. आरोपी सोबत तिचा आपसी समझोता झाला असल्याने समझोता पुरशीस नि.क्र. १४ वर दाखल केली. तसेच फिर्यादीस सदरची केस पुढे चालवायची नसल्याचे सांगीतले. त्यामुळे तिला सदरचे प्रकरण चालविण्यास स्वारस्य नसून तिला पुढील साक्षीदार तपासायचे नाही. असे कथन केलेले आहे.

**०७.** सदर साक्षीदाराची आरोपीपक्षातर्फे उलटपासणी घेतली असता आरोपीसोबत तिचे न्यायालयाबाहेर प्रकरण मिटले असल्याचे सांगीतले. तसेच फिर्यादीस आता आरोपीविरुध्द कुठलीही तक्रार नसून सदरचे प्रकरण तिला बंद करायचे असून पुढील साक्षीदार तपासायचे नसल्याचे तिने मान्य केलेले आहे.

**०८.** आरोपीने फिर्यादीचा शारीरीक अथवा मानसिक छळ करून शिवीगाळ करून धमकी दिली आणि पैशांची मागणी केली असे दर्शविणारे पुरावे अभिलेखावर आलेले नाही. त्यामुळे आरोपींविरूध्दचे आरोप सिध्द झालेले नाहीत. सबब मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आहे आणि मुद्दा क्र.५ बाबत खालील आदेश पारीत करण्यात येत आहे -

**<u>: : आ दे श : :</u>**

**०१.** आरोपी क्र.१ मनसुर जबार अली, क्र. २. जबार बाबाकनू अली यांना भारतीय दंड संहितेचे कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम

३४ अन्वये दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**०२.** आरोपींचे जामीन कदबे रद्द करण्यात येते.

**०३.** आरोपींचे कलम ४३७(अ) प्रमाणे प्रत्येकी रुपये १५,०००/- रुपयाचे बंधपत्र रदद् समजण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.)

APEKSHA TULARAM BANSOD

Digitally signed by APEKSHA TULARAM BANSOD
Date: 2025.05.05 17:37:15 +0530

**(ए.टी. बनसोड)**

**दिनांक :०२.०५.२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.४),**
**बेलापूर, नवी मुंबई.**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word to word, as per the assigned Judgment.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | :- S. P. Nagrale |
| Court | :- Judicial Magistrate, F.C. (Ct. No.4) |
| Judgment signed by the Presiding Officer on | :-02-05-2025 |
| Judgment uploaded on | :-05-05-2025 |